म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५४७



# सवाल...

चंद्रकांत खोळसकर

REFBK-0024943
REFBK-0024943

संदर्भ काव्य
२५४९
२४९४३
१५।४।८६

प्रभा प्रकाशन
यांसंस्थेकडून
सप्रेम भेट - भगव
श्री पांडुरंग चव्हाण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(कृ. मा. पहा)
५०००-३-८४

# " सवाल "

चंद्रकांत साळसकर

REFBK-0024943
REFBK-0024943

प्रभा प्रकाशन
पहिली आवृत्ती, जानेवारी १९८६

© १९८६ सौ. वैशाली तांबे
५/१११, एम. जी. एम. कंपाऊंड,
डॉ. एस. एस. राव रोड,
परळ, मुंबई–४०० ०१२.

मुखपृष्ठ
नयन मोहिते

प्रकाशक
सौ. प्रभा चव्हाण
गणेश प्रसन्न, कोपरीगांव,
ठाणे (पूर्व) ४००६०३.

मुद्रक
तुकाराम काशीद
सचिन आर्टस्,
बनजी भाई चाळ,
केतकी पाडा, दहिसर (पूर्व), मुंबई–४०० ०६८.

किंमत पंधरा रुपये



तिर्थरुप आजोबा

यांच्या अविस्मरणिय स्मृतीस

अर्पण .......

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
२५८१
ग्र. क. २४८४३
का. १५।५।८९
शाखा (स्थळ प्रत)

# आशीर्वाद

श्री. चंद्रकांत साळसकर ह्यांचा 'सवाल' हा कविता संग्रह मी वाचला तेव्हां मला जाणवले की ह्या नुसत्याच एका कवीच्या कविता नाहीत तर भारतीय स्त्रीचा वेदनेने ठणकणारा आत्मा ज्याला अचूक समजला आहे अशा जीवंत मातृहृदय असलेल्या एका पुरुषाचे हे गदगदून बाहेर फुटलेले हुंदके आहेत. स्त्रीच्या रडण्यापेक्षा पुरुषाचे रडणे अधिक करुण, आणि अधिक दुःसह असते. स्त्री रडते तेव्हां ते नैसर्गिक वाटते. कारण निसर्गाने वारंवार रडण्यासाठीच जणू तिला जन्म दिला आहे. परंतु पुरुष हा रडण्यासाठी जन्माला आलेला नाही. म्हणूनच दुःख कमालीचे असहय झाल्याखेरीज तो हंबरडा फोडीत नाहीं. म्हणूनच पुरुषाचा हंबरडा ऐकणं फार क्लेशदायक असतं. चंद्रकांत साळसकरांच्या ह्या कविता संग्रहातील एका एका कवितेतून ठिणग्यांसारखे तडतडत बाहेर पडलेले हूंदके मला ऐकवेनात ... सहन होईनात. **"निसर्गाने गर्भाशय माथी मारले"** म्हणुन स्त्रीच्या वाट्याला अखंड अवहेलना आली आहे. स्त्रीवरील बलात्काराने खडबडून जागृत झालेल्या एका पुरुषाचा आक्रोश मी त्यांच्या कवितेतून ऐकला आणि एका पुरुषाने व्याकुळ होऊन विचारलेला त्यांच्या कवितेतला 'सवाल' माझ्या कानाचे पडदे फाडीत, माझ्या काळजाला घरे पाडीत, माझ्या आत्म्याला सुन्न करीत गेला –

**'अपघातात चुराडा झालेल्या**
**वाहनाची भरपाई**
**विमा कंपनी देत असेल**
**तर बलात्कारात चुरडलेल्या**
**भावनांची भरपाई**
**समाजाने का देऊ नये?'**

चंद्रकांत साळसकरांनी ह्या कविता स्त्रीमुक्ती आंदोलनाचा प्रचार करण्यासाठी लिहिल्या आहेत असा जरी त्यांचा दावा असला तरी ह्या समाजातली एक विदारक वस्तुस्थिती यथातथा चितारताना त्यांनी जे काव्य निर्माण केले आहे ते प्रचाराच्याहि पलिकडे जाऊन पोचले आहे. खरोखरीच त्यांच्या कवीच्या आत्म्याला स्त्रीदुःखाच्या जाणिवेने ज्या जखमा झाल्या त्यातून भळाभळा ओघळलेल्या रक्ताच्या धारातूनच त्या कवितांचा जन्म झाला आहे, असे जर मी म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. त्यांच्या कवितांचे मूल्यमापन करतांना त्या कवितांचा वाङ्मयीन दर्जा किंवा त्या कवितांचे काव्यगुण इत्यादि विचार बाजुला

ठेवूनच ते करायला पाहिजे. त्यांचा कवितातला भावनांचा उद्रेक इतका अस्सल आहे, स्त्रियांवरील अन्यायाचे चित्रण करतांना त्यांनी वापरलेले शब्द इतके धारदार आणि उपरोधिक आहेत की त्यांच्या कवितांचे काव्यपरीक्षण करण्याच्या अवस्थेत तुम्ही रहातच नाहीत. प्रचलित समाज व्यवस्था आणि रूढी ह्यांच्या बद्दलचा तीव्र संताप, चीड आणि तिरस्कार तुमच्या रक्तातून आवेगाने वाहू लागतो — तिथे कवितेच्या काव्यगुणाचा विचार तुम्ही काय करीत बसणार? त्यांच्या कवितांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी समाजाला जागवण्याचे कार्य उत्तम साधले आहे हे निश्चितपणे म्हणता येईल. त्यासाठी त्यांच्या काही कवितांचा परिचय करून घेऊ.

**'खळाळणाऱ्या लाटांनो'** ह्या कवितेत लाटांचे खळाळतेपण पाहून त्यांना स्त्रीच्या अंतःकरणातील उसळत्या उर्मीची, त्यांच्या रक्तातील नैसर्गिक आवेशाची आठवण येते. पण तत्क्षणीच त्यांचे मन उद्विग्नही होते. कारण कुठेतरी त्यांना सीतेच्या जीवनाला घातलेल्या लक्ष्मणरेषेची आठवण येते. ती लक्ष्मण रेषा ओलांडण्याचा प्रयत्न करताच राक्षसाची शिकार होण्याचे दुर्भाग्य तिच्या वाट्याला आले हे आठवून, तसाच तिचा वनवास, तिचे अग्निदिव्य आठवून लाटांच्या उसळण्यातली व्यर्थता त्यांना जाणवते आणि त्यांचे मन उद्विग्न होते. तरीही ते लाटांना म्हणतात की तुमची परीसीमा तुम्ही ओलांडाच. त्याशिवाय **'हिडीस गटारं'** वाहून जाणार नाहीत.

**'पहाटेपासून'** ह्या कवितेत स्त्री आपल्या सामर्थ्याची आहुती पुरुषाच्या नव्हे जगाच्या सुखासाठी कशी करीत असते हे त्यांनी सांगितले आहे.

**काश्मीरचं नंदनवन**<br>
**मीच फुलवलंय**<br>
**माझ्या हास्याची**<br>
**आहुती देऊन'**

असे ते स्त्री विषयी म्हणतात. पहाटे उठल्यापासून स्त्री जगाच्या सुखासाठी राबत असते. आणि रात्रीही ती अंधाराचे स्वागत करायला फिरून सिद्ध होते. तिची आहुती अखंड चालूच असते.

भावाला **"ती. भाईस"** ह्या कवितेत पत्र लिहिणारी वनिता त्याला सांगते,

**तू माझी वाट पहाशील**<br>
**गोडधोड जेवण करून**<br>
**परंतु मी येणार नाहीए**

**रक्षाबंधन आहे म्हणून**

वनिता भावाला बजावते की आमचं रक्षण कुणी करायला हवं ही भावना आम्ही आता सोडून द्यायला हवी – **द्रौपदीची असाहयता आता विसरायला हवी.**

**'आदीमापासून'** आणि **'समिकरण'** ह्या दोन्ही कवितांतून त्यांनी पतिपत्नीच्या नात्यातल्या समानतेचा आवेशपूर्ण उच्चार केला आहे. **"आदीमापासून" ही त्यांची कविता खरोखरी स्त्रीच्या समान हक्कांचे एक गौरवगीतच आहे."** ह्या गीताची नायिका म्हणते –

**'आदीमापासून आतापर्यंत**
**तू मला फरफटत आणलंस**
**तुझ्यामागून –**
**अगदी पाय ठेचाळले**
**त्याची तमा न करता**
**जन्मगाठीचं**
**भांडवल करून**
**अन् तुझ्यामागून धांवताना**
**मी माझ्या**
**भावनांची, समाधानाची**
**प्रेतं गाडली स्मशानात**
**तुझ्याच अश्वमेधाच्या**
**चौखूराखाली चिरडलेली**
**पण तो अश्वमेध**
**आता मी रोखणार आहे**
**संघर्षासाठी सज्ज होऊन**
**तुझ्याशी मी गाठ बांधेन**
**तुझी जीवनसाथी म्हणून**
**पण सप्तपदी करताना**
**तुझ्यामागून चालणार नाही**
**तुझी सावली बनून.**

**'समिकरण'** ह्या कवितेतही आपल्या समान हक्कांची रास्त आणि न्याय्य जाणीव झाल्या नंतरच्या आत्मविश्वासाने ती पुरुषाला बजावून सांगते की नाण्याला दोन बाजू असल्या तरी त्याची किंमत सारखीच असते. मग आपण दोघेही सत्ता निम्मी निम्मी वाटून घेऊ या समिकरणाच्या नियमानुसार –

सहनशीलता ही स्त्रीची शक्ती आहे. तो तिचा स्वभाव आहे आणि समाजाकडून नेहमी सहनशीलतेचाच उपदेश तिला केला जातो. पण सहनशील धरतीच्या पोटातही लाव्हा गदगदत असतो, तसाच सहनशील स्त्रीच्या पोटातही असंतोष धुमसत असतो. कारण समाज स्त्रीच्या सहनशीलतेचा अंत बघतो. आणि मानवतावादी दृष्टीकोनातून तिच्या सोशिकतेचे मूल्य ठरवीत नाही म्हणून कवी म्हणतात –

'होऊन जाऊ दे उद्रेक
भडकू दे ज्वाला
अगदी प्रत्येक क्षणाला
तेव्हाच क्रांतीच्या उषःकालातून
मुक्तीचा सूर्य उगवेल –"

**'पडसाद'** ह्या कवितेत तर बलात्कारीत स्त्रियांची वेदना असह्य होऊन जणू आतून धुमसत कवीने असंतोषाची आग ओकली आहे. साऱ्या समाजालाच त्याने पोटतिडकीने 'सवाल' टाकला आहे की,

'अपघातात चुराडा झालेल्या
वाहनाची भरपाई
विमा कंपनी देत असेल,
तर बलात्कारात चुरडलेल्या
भावनांची भरपाई
समाजाने कां देऊ नये?

**'उत्तर'** या कवितेत नायिकेने पुरुषाला पुन्हा तीव्र पोटतिडीकीने प्रश्न विचारलाय. –

तुझ्यात असं काय दुणं आहे
त्याची मी किंमत मोजावी?
आणि माझ्यात असं काय उणं आहे
त्याची मी किंमत द्यावी?

ह्या कवितेतही स्त्रीच्या सहनशीलतेचा फार समर्पक शब्दात कवीने गौरव केला आहे. त्यांची ही एक उत्कृष्ट कविता आहे. एका पुरुषाने स्त्रीच्या हृदयात शिरून, तिच्या भूमिकेतून हा 'सवाल' पुरुषाला विचारला आहे हे विशेष कौतुकास्पद आहे.

त्यांच्या प्रत्येक कवितेत असे वेगवेगळे मर्मभेदी प्रश्न विचारले गेले आहेत. 'मळलेली वाट चालतांना' ह्या कवितेत एकट्या स्त्रीनेच वेदना सोसण्याची मक्तेदारी घ्यावी असं **'कोणाचं फर्मान आहे कां?'** असा प्रश्न काकुळतीला येऊन विचारला आहे. समाज हा परिवर्तनशील असावयास हवा हे कवीचे स्वप्न त्याने या कवितेत व्यक्त केले आहे. **'क्रांती'** ह्या कवितेत गर्भवती स्त्रीला डोहाळे लागलेत क्रांतीचे ती 'प्रसवणारच आहे बाळाला स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी' **'निर्धार'** ह्या कवितेत आपली झालेली बेइज्जत पुसून टाकण्यासाठी ती इर्षेने इतकी पेटली आहे की प्रस्थापितांच्या संस्कृतीचा खून केल्याचर तिला जन्मठेप वा फाशी झाली तरी तिला त्याची पर्वा नाही. कधी कधी त्यांच्या कवितेतल्या स्त्रीची मूळची ममता हळूवारपणे फुलते आणि ती सूडबुद्धीने नव्हे तर समंजसपणे पुरुषाला विचारते.

**'तू मला प्रेमाची**
**सुसंगत देशील कां?**
**माझ्यासहित**
**माझ्या व्यक्तिस्वातंत्र्याला**
**समजून घेशील कां'?**

**'माय'** या कवितेतली नायिका एक निरागस बालिका आहे. आपली आई एक स्त्री असूनही ती आपण आणि आपला भाऊ ह्यांच्यात भेदभाव करते हे पाहून ती विषण्ण होते आणि आईला विचारते –

**दोन डोळे दोन कान**
**दोन हात दोन पाय**
**मग दादात नि माझ्यात**
**फरक काय?**

उद्याच्या जगात पुरुषाच्या बरोबरीने उभे रहावयाचे आपले सामर्थ्य त्याच्या इतकेच आहे हे सिद्ध करावयाचे तर स्त्रीला आपण नाजूक आहोत हे विसरायला हवे. म्हणून ते म्हणतात –

**नवी आव्हाने स्वीकारताना**
**फुलांनो तुम्ही काटे बना'**

ह्या सर्व कविता लिहिताना कवीच्या शब्दात आवेश आहे, त्वेष आहे, जोष आहे. कारण स्त्रीचे दुःख त्याला बघवत नाही आणि तो स्वतःच वेदनेने आत घुमसतो आहे. तरीही तिने समर्थपणे उभे राहून अन्यायाचा प्रतिकार करा-

यला हवा अशी सतत शिकवण त्यांनी आपल्या समर्थ शब्दातून सारखी स्त्री जातीला दिली आहे. पण कवीचे मोठेपण त्यांच्या **'निर्णय'** ह्या कवितेतून मला जाणवले. स्त्रीने हक्कांसाठी लढायला हवे हे सांगत असतांना कवि हे विसरलेला नाही की अखेर स्त्री म्हणजे रणांगणावरचा हत्यार परजणारा एखादा निष्ठुर योद्धा नव्हे – तर प्रीतीचे सुंदर स्वप्न पहाणारी, अमृताचे दान करणारी दयेची देवता आहे. **'निर्णय'** या कवितेतली नायिका पुरुषाला एक आर्त 'सवाल' करते की मला फुलासारखे जपण्याचे नुसते आश्वासन कां देतोस? आपल्या प्रेमाचा किल्ला किनाऱ्यापासून दूर कां बांधीत नाहीस?

ह्या प्रश्नातच जणू कवीला स्त्रीच्या प्रीतीचे रहस्य सापडले आहे. स्त्री ही काही पुरुषाचा द्वेश करणारी आणि त्याच्यावर सूड घेऊ पहाणारी साता जन्माची कुणी वैरीण नाही. अखेर तिलाही प्रेमच हवे आहे. त्या प्रेमासाठीच ती जगणार आहे– कुटुंबाला, समाजाला जगवणार आहे. एका प्रेमासाठीच ती आपले सर्वस्व पणाला लावीत असते. पण ज्याच्या साठी ती आपल्या जीवनाचा होम करू पहाते त्याने त्या होमाचे पावित्र्य सांभाळावे एवढीच तिची अपेक्षा असते. स्वतःच्या जीवनाचा होम झाल्याचे दुःख तिला तितके जाचत नाही पण त्याची विटंबना झाल्याचे दुःख मात्र तिला असह्य होते. तिच्या दिव्य प्रेमाचा अपमान पुरुषाने करू नये हीच तिची खरी मागणी आहे. तिला पुरुषाने योग्य तो आदर द्यावा, आणि मगच तिच्याकडून तो घ्यावा हीच तिची मनीषा आहे.

चंद्रकांत साळसकर ह्यांच्या 'सवाल' ह्या कविता संग्रहातले असे अनेक मर्मभेदी 'सवाल' आपल्या काळजाला जाऊन भिडतात. एका पुरुषाला इतके सहृदय होता आले. हा केवढा विलक्षण चमत्कार आहे! कदाचित् स्त्री दुःखाने इतके व्याकुळ होऊनच जणू पुरुषांपुढे त्यांनी आपल्या काव्यातून एक नवा आदर्श निर्माण करून ठेवला आहे. भारतीय पुरुषांच्या हृदयात स्त्री जातीविषयीचा असा डोळस कळवळा स्त्रीमुक्ती आंदोलनाला जागृत करता आला – जो चंद्रकांत साळसकर ह्यांच्या हृदयात जागृत झाला – तरच ह्या आंदोलनाला खरे यश लाभले असे मी म्हणेन. एवढे मात्र खरे की चंद्रकांत साळसकर ह्यांचा 'सवाल' हा कवितासंग्रह जो पुरुष वाचक आस्थेने वाचेल त्याच्या काळजात स्त्री जातीबद्दल दयेचा पाझर फुटल्याखेरीज रहाणार नाही.

**शिरीष पै**

१३–१–८६

# ऋणनिर्देश

दोस्तांनो, 'सवाल' हातात देताना होणाऱ्या अत्यानंदात भगिनी सौ. शैलजा कदम, बंधू प्रकाश साळसकर, डॉ. प्रभाकर नाईक, डॉ. देवल, शशिकांत गांवकर, रवींद्र सावंत, बबन पेडणेकर, तुळशीराम पेडणेकर यांना कसा विसरू बरे? वीर शंकरराव पेंढारकर, श्री. ह. सु. चिले सर यांच्याही सहवासाने पापण्या पालवल्या हं! श्री. प्रकाश कदम यांच्या निखळ प्रेमाने झेप घेण्यास सरसावलो. प्रकाशक सौ. प्रभा चव्हाण, अल्प वेळेतही तत्परतेने छपाईचे आव्हान पेलणारे मुद्रक तुकाराम काशीद, आणि फक्त सुबकच नव्हे तर उत्कृष्ट मुखपृष्ठ चितारणारे चित्रकार नयन मोहिते तसेच युवा साहित्य समाज, मुंबईचे सारे सवंगडी या सर्वांचा मी ऋणी आहे.

सोबत 'सवाल' चे प्रकाशन ज्यांचे शुभहस्ते संपन्न होत आहे, ते आदरणीय प्रा. गं. बा. सरदार आणि प्रस्तावना देऊन संजीवनी देणाऱ्या सन्माननीय शिरीष पै यांचा मी मनस्वी ऋणी आहे.

चंद्रकांत साळसकर
५।१११ एम. जी. एम. कंपाऊंड,
डॉ. एस. एस. राव रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | शब्दानो | १ |
| २) | 'चि. भाईस' | २ |
| ३) | पंचनामा | २ |
| ४) | आदीमा पासून | ३ |
| ५) | तळपणाऱ्या सूर्या | ४ |
| ६) | आम्ही | ५ |
| ७) | बाय | ६ |
| ८) | अरे भ्रमरा | ७ |
| ९) | पडदा उघडल्यावर | ८ |
| १०) | नवी आव्हाने स्विकारताना | ९ |
| ११) | आयुष्याच्या अंबारीत | १० |
| १२) | मळलेली वाट चालताना | ११ |
| १३) | उत्तर | १२ |
| १४) | पहाटेपासून | १३ |
| १५) | समिकरण | १४ |
| १६) | खळाळणाऱ्या लाटानो | १५ |
| १७) | पडसाद | १६ |
| १८) | क्रांती | १७ |
| १९) | निर्धार | १८ |
| २०) | माय | १९ |
| २१) | थांबा डॉक्टर थांबा | २० |
| २२) | निष्ठा | २१ |
| २३) | निर्णय | २२ |
| २४) | अनुबंध | २३ |
| २५) | टिळा | २४ |
| २६) | सांगशील कां ग आई? | २५ |
| २७) | अहो ऐकलेत कां? | २६ |
| २८) | शीड | २७ |
| २९) | ठिणगी | २८ |
| ३०) | हिरवा चुडा | २८ |

| | | |
|---|---|---|
| ३१) | दव | २९ |
| ३२) | समजून घेशील कां? | ३० |
| ३३) | हुळरे शब्द | ३१ |
| ३४) | मला मुलगा झाल्यावर | ३१ |
| ३५) | पेगच पेग | ३२ |
| ३६) | अर्भकाचे प्रश्न | ३३ |
| ३७) | मोड वादळ | ३४ |
| ३८) | ध्येय गीत | ३५ |
| ३९) | महापूर | ३६ |
| ४०) | चैत्रवेलीचे मनोगत | ३७ |

# शब्दानो

शब्दानों सुटा सू सू करत
बंदुकीच्या गोळीगत
पडूदे मुडद्यावर मुडदे
अगदी बेलाशक
अन्यायाचे समर्थन करतांना
सहनशीलतेचा उपदेश होतो
आणि तुम्हांला
धरतीची उपमा मिळते
माणूसपणा जगण्यासाठी नव्हे
तर सोशिकपणा जगवण्यासाठी
तुमचा जन्म आहे काय?
उनपावसाचा बेसुमार मारा सोसून
जीव हबकतो
मग उदरात गदगदणारा लाव्हा
किती वेळ सोसणार तुम्ही?
होऊन जाऊदे उद्रेक
भडकू दे ज्वाला
अगदी प्रत्येक क्षणाला
तेव्हाच क्रांतीच्या उषःकालातून
मुक्तीचा सूर्य उगवेल –!!!

# ‘चि. भाईस’

चि. भाईस
सप्रेम वंदे,
पत्रास प्रयोजन की,
आनंद झाला तुझे पत्र वाचून
परंतु द्रौपदीची असहायता,
आता विसरायला हवी.
आणि इंदिराजींची शुरता, वीरता
अनुसरायला हवी
साप कात टाकतो तशी!!
आणि उद्या,
तू माझी वाट पहाशील
गोडधोड जेवण करून
परंतु मी येणार नाहीए
रक्षाबंधन आहे म्हणून –
तुझी वनिता

# ‘पंचनामा’

अपघाताचा पंचनामा करताना
पंच देखिल त्यांचेच असतात
लाचखाऊ --
आणि कायद्याची मोजपट्टी
अपुरी पडते,
गुन्ह्याचे मोजमाप करायला
म्हणून सहीसलामत सुटतात
अपघाती --]
घातपात करूनही !
आंधळं दळते
आणि कुत्रं पीठ खाते
दुसरे काय?

# आदीमापासून ....

आदीमापासून आतापर्यंत
तू मला फरफटत आणलंस
तुझ्यामागून ...
अगदी पाय ठेचाळले
त्याची तमा न करता
जन्म गाठीचं
भांडवल करून!
अन् तुझ्यामागून धांवताना
मी माझ्या
भावनांची, समाधानाची
प्रेतं गाडली स्मशानात
तुझ्याच अश्वमेधाच्या
घोड्याखाली चिरडलेली.
पण तो अश्वमेध,
आता मी रोखणार आहे
संघर्षासाठी सज्ज होऊन!
तुझ्याशी मी गाठ बांधेन
तुझी जीवनसाथी म्हणून
पण सप्तपदी करताना
तुझ्यामागून चालणार नाही
तुझी सावली बनून —- . .

# 'तळपणाऱ्या सूर्या'

तळपणाऱ्या सूर्या
या सागराची वाफ करशील कां?
कारण तुझ्या किरणांचे प्राबल्य
क्षकिरणांहूनही बेफाट आहे
आणि इथले किडेमकोडे
किरणांहूनही अफाट आहेत —
अत्याचाराचा डोंब उसळतात
तेव्हां माणूसपण विरतात
आणि सोलीवपणाचा साज लेवून
गल्लीगल्लीत मिसळतात
यांच्या लाटांना भरती येते ना,
तेव्हां विषाचा चीत्कार करतात रे
त्यात किती मरतात, गुदमरतात
याची नाही तमा!!
अरे हा राजरोस हैदोस पाहून
नजरा विटल्या रे
पापण्या मिटल्या रे
पण फडफडतात
सुखाचा उषःकाल बघण्यासाठी
आणि म्हणून
या किड्यामकोड्यांना साफ करशील कां?
तळपणाऱ्या सूर्या
या सागराची वाफ करशील कां?

# - आम्ही -

आम्ही,
आम्ही आहोत पक्षी
चंचुपात्रातल्या रात्रीत फडफडणारे
बाहेरचे जग बघतो
काच पारदर्शक आहे म्हणून
एरव्ही आमचे जीवन
काचेच्या कटोरीत बंदिस्तच आहे

समाज आम्हाला मुलद्रव्य समजतो
आमच्यावर प्रयोगही करतो
आश्चर्य बघा,
बनणारे संयुग
आमच्या जातीचे नसेल ना
तर ते आपसूक बाहेर पडते
आणि आमच्याच जातीचे असेल ना,

तर चंचूपात्रातच अडकते
आमच्यासारखेच –
पंख असून पंख छाटल्यागत
संस्कृतीच्या कात्रीत तडफडणारे

आम्ही,
आम्ही आहोत पक्षी
चंचूपात्रातल्या रात्रीत फडफडणारे

ग्रंथालय ठाणे
2589
दा. क्र.
काव्य

६

# ' बाय '

सोळावे वरीस धोक्याचे म्हणतात
मग तुम्ही माझे लगिन
तिसाव्यापर्यंत का लांबवलात?

कर्तृत्वाच्या चमकतेवर
नि सौंदर्याच्या मोहकतेवर
शेकडोवर उड्या पडत होत्या
तरी मला कुढत कां ठेवलात?

रंगीला चार मुलेही झाली
गंगी लंडनला निघून गेली
मी मात्र या सखींना
अधाशी असून शुभेच्छा दिली . . .

तेव्हां माझ्या पापण्या
विषादल्या होत्या माय . . . !
आणि आज,
एका विधूराशी जन्मगाठ बांधताना
खंडीभर हुंडा कां ओतलाय?

× ×

तुझ्या जीवापरीस पैशाला किंमत काय?
स्त्रीमूल्याची पट्टी नाजूक हाय . . .
गोठलीतल्या वासराला ते कळणार नाय
अगं त्याचे कुटुंब फार मोठे हाय
वेळ आलीच –
तर त्यांची उष्टी खाऊन
पोट भरशील बाय . .
पोट भरशील बाय . . .

# अरे भ्रमरा

अरे भ्रमरा
आमच्या पाकळ्यावर
जेव्हां ओरखाडे ओढतोस
ते आम्ही खुशाल सहन करतो
तुझ्या प्रेमापोटी –
पण भुलेश्वरच्या बाजारात
आमची जेव्हां विक्री होते,
तेव्हां तू कुठे असतोस झक मारत?
शोभेची वस्तू बनून
आम्ही सारे सजवायचे
स्वातंत्र्याचा चक्काचूर करून
आणि कधीही कुणाच्याही
पुढ्यात पडायचे
अगदी जीवंत मरून!!
आमच्या मोहकतेवर
वारेमाप गल्ला घ्यायचा
प्रस्थापितांनी,
आणि आमच्या सुगंधाचा
सौदा झाल्यावर
आम्ही बसायचे अधाशावाणी
आकाशातील तारे मोजत
दगडाच्या देवाला आम्हांला वाहतात
अगदी कळी असतांना सुद्धा,
आणि पुजारीच लयलूट करतो
आमच्या सुगंधाची
स्वतःच्या मालमत्तेसारखी
आम्हांला कुठेही ठेवती
गंजलेल्या सुईनेसुद्धा ओवती
मी असहाय देठातून तुटलेली
जीवनातून उठलेली
म्हणून तू तुझ्या क्रांतीचे
कडे करशील का आमच्या भोवती?
आम्हांला देठावरच खुलायचे आहे
वाऱ्यासंगे झुलायचे आहे –

# पडदा उघडल्यावर

पडदा उघडल्यावर
आमचा मुखडा पाहून
प्रेक्षक खिन्न होतात
पावसाळ्यात झाकोळलेल्या
आकाशागत —
आम्ही मात्र प्रेक्षकांना
आधारभूत व्हायचे
अमावास्येतील प्रकाशागत
हा इतिहास आहे,
आमच्या अस्तित्वाचा!
लेखकाच्या संहितेप्रमाणे
दर्शकाच्या सूचनेप्रमाणे
चाकोरीतील संवादफेक करायचा !!
सुप्त अभिनयाची मोडावळ करून
देह प्रदर्शन करायचे, शोभची वस्तू बनून,
काल्पनिक नाटक रंगवण्यासाठी –
म्हणून, चकाकणाऱ्या वीजानों,
कोसळा विंगेत
गर्भातील अर्भक बनून
म्हणा संघर्षाची नांदी
कंकणे किणकिणून
पडदा उघडल्यावर
वास्तवतेचे नाटक करण्यासाठी – ...

# नवी आव्हाने स्विकारताना

नवी आव्हाने स्वीकारताना।
धमन्यानो तुम्ही प्रबळ बना।
नवी आव्हाने स्वीकारताना।
शब्दानो तुम्ही सबळ बना।

वाऱ्यासंगे डुलताना।
कळ्यानो तुम्हीं खुडताना।
नवी आव्हाने स्वीकारताना।
हिऱ्यासारख्या कणखर बना।

सौदत्तीमध्ये फुलताना।
उदबत्तीनो जळताना।
नवी आव्हाने स्वीकारताना।
वीजे सारख्या प्रखर बना।

यल्लम्माला पुजताना।
पालखीसवे सजताना।
नवी आव्हाने स्वीकारताना।
फुलांनो तुम्ही कांटे बना!!
फुलानों तुम्ही काटे बना। !!!

# आयुष्याच्या अंबारीत

आयुष्याच्या अंबारीत
आमच्यासाठी गालिचा आहे
बाहेरून झुंबर चढवलेला
आणि आंतून
काटयाकुटयांनी मढवलेला
त्यात आम्ही आरूढ होतो
परंपरेची वीण विणत
भेदरलेल्या हरणीगत
चार भिंतीच्या कोंडवाडयात
उसासाही कोंडला जातो
सनईचा सूर ओढून
फुगलेल्या नरडीगत
आम्ही श्वासावाटे
कार्बनडाय ऑक्साईड घेतो
जगाचे दुःख पचवण्यासाठी
आणि उच्छवासावाटे
ऑक्सिजन सोडतो
साऱ्या जगाला हसवण्यासाठी
म्हणून वाटते आमचे जीवन
भूकंपाने थरथरल्यागत
तरीही आम्ही जगतो आहोत
सरणावरले मरण बघत – ...
सरणावरले मरण बघत – ...

# मळलली वाट चालताना

मळलेली वाट चालताना
पायाला खडे टोचतात
हाताला काटे बोचतात
आडवळणी वाटेसारखे!
तरीही मी चालते आहे
कुणाचं फर्मान आहे म्हणून
कोण म्हणतं हे माळरान आहे ?
दुरून डोंगर साजरे . . .
हे आहे घनदाट अरण्य
दिवसालाही रात्र बनवणारे
गांधील माश्याही डसतात
जीवघेण्या वेदना देत
त्याही आम्ही सोसतो आहोत
कुणाचं फर्मान आहे म्हणून!!
खदाखदा हसताना
आम्ही आमच्याशी बेईमान होतो
सचेतन असून अचेतन बनून
आमच्या लेखी बहरलेला वसंत
करपणारा ग्रीष्मच असतो म्हणून !!!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# उत्तर

मानेवर जू ठेवले
तरी ते ओढण्यासाठी
मी पदर खोचून उभी आहे
स्वतःच्या पायावर!
मला नाही लाटांची तमा
त्याही छाताडावर झेलीन मी
हिमालयावर रोहण करताना
शिशिराचे आव्हानही पेलीन मी
मन मनगट बळकट करून!!
बनलं आहे गंभीर
माझं हृदय
कोसळणाऱ्या वीजाना अडवून
बनलं आहे खंबीर
माझं पाऊल
वाटेवरले निखारे तुडवून,
आता गप्पागोष्टी करायला
एखदा येशील तू ?
तुझ्यात असं काय दुणे आहे,
त्याची मी किमत मोजावी?
आणि माझ्यात असं काय उणे आहे
त्याची मी किंमत द्यावी?
याचे उत्तर देशील तू?

# पहाटेपासून

पहाटेपासून
मी रहाट ओढत असते
डोळ्यावर झापड बांधून
कारण मी फुलबाग
फुलवित आहे,
मधुर उदासीनतेत
आपसुक पावले पडतात
अरुंद रिंगणात
उदास शीतलतेत
शब्दांचं तेज मूकपणे
करपून गेलंय
काश्मीरचं नंदनवन
मीच फुलवलंय –
माझ्या हास्याची
आहुती देऊन
त्याचं सौंदर्यपान करून
जगाला सुखाची नशा चढते
आणि मी
भल्या रात्री
झापड उघडल्यावर
अंधाराचे स्वागत करते . . .

# समिकरण

मी तुझी सावली आहे
असे तू म्हणतोस
मग माझ्या सावलीचा
वाली कोण?
तुच ना?
म्हणजेच तु माझी सावली आहेस!
आणि आपल्या संबंधाचे
बरोबर चिन्ह
समाजाच्या साक्षीने
मध्ये पडल्यावर
तुझे माझे समिकरण बनते
समिकरणाच्या दोन्ही बाजुवर
कुठलीही बैजिक क्रिया केल्यावर
तीची किमत बदलत नाही
ती दोन्ही बाजूला
सारखी आणि सारखीच रहाते
मग पूर्वापार
माझ्या मानवी हक्कांचे समिकरण
तू चुकीचे मांडत कां आलास?
तू सत्ताधारी आहेस म्हणून ना?
मग सत्ताच
आपण निम्मी निम्मी वाटून घेऊया
समिकरणाच्या नियमानुसार ---

# खळाळणाऱ्या लाटांनो

खळाळणाऱ्या लाटांनो
कशाला जपताय –
सीतेचा आदर्श?
लक्ष्मण रेषेत अडकून
क्रूर मारीचाची
शिकार व्हायचंय?
की संशय बळी बनून
अग्नीदिव्य करण्यासाठी
वनवासात जायचंय?
खळाळणाऱ्या लाटांनो
कशाला फक्त उसाळताय
जीव हबकेपर्यन्त
ओलांडा ना तुमची परीसीमा
अगदी एकदाच ––
आणि गरज पडली
तर अनेकदाही !!!
म्हणजे ––
प्रचंडाच्या पापणीत
साचलेली हिडीस गटारं
तरी वाहून जातील –!!!

# पडसाद

जेव्हा कानावर पडसाद पडतात
तेव्हा पांढऱ्या पेशी बंड करतात
परंतु सरसावलेले हात थांबतात
तेच सुयोग्य वाटते

आणि बलात्कार झाला म्हणून
आत्महत्या करणे अयोग्य वाटले
खरेच कां म्हणून बेढब चार शब्दांना
अवाजवी महत्व द्यावे?

आयुष्यातील अणकुचीदार क्षणी
हरणीसारखी पाळथी पाडलेल्या
ललनेचा दोष

की कामवासनेने कामांध झालेल्या
लांडग्याचा दोष

याचा प्रतिशोध केला कुणी ?

निसर्गाने गर्भाशय माथी मारले
म्हणून स्त्रीत्वाची अवहेलना!

परंतु क्षणात
स्त्रीयांच्या शीलाचा फुगा फोडून
ताठ मानेने चालायचा अधिकार
फक्त पुरुषांनाच कोणी दिलाय?

'बलात्कार' याचा शब्दकोषातील अर्थ
बळजबरीने संभोग असा असताना
निरपराध स्त्रीला "अक्षम्य अपराधी"
म्हणजेच पातक आहे

अपघातात चुराडा झालेल्या
वाहनाची भरपाई
विमा कंपनी देत असेल
तर बलात्कारात चुरडलेल्या
भावनांची भरपाई
समाजाने कां देऊ नये?

# क्रांती

मला दिवस गेलेत
म्हणून मी माझीच
वेऊ लागलेय दक्षता
अन् स्वकियांनी फेकल्यात
बिनदिक्कत
बेफिकीरीच्या अक्षता
कारण मला डोहाळे लागलेत
ममतेचे
मानवी मूल्यांच्या समतेचे
गर्भातील अर्भक
ढुश्याही देतेय
आणि त्या भावनिक तरंगात
पौराणिक वलय विरून जातंय
मग माझे कुठले ओ डोहाळ जेवण ?
तरीही मला तमा नाहीं त्याची
मी निब्बर बनलेय
माझे मीच काढण्यासाठी
बाळंतपण --
सागर उफाळला तरी
ज्वाला भडकल्या तरी
प्रसवणारच आहे बाळाला
स्वातंत्र्याच्या संग्रामासाठी
करणार आहे संगोपन
आभाळ कोसळले तरी
त्याचे नाव ठेवून
क्रांती - . . .

# निर्धार !

जन्मठेप होऊ देत
अगर फाशी देऊ देत
मला नाहीं त्याची कदर
तू अनेकदा खून केलास
बेइज्जत
माझा ओढून पदर
तरीही मी आभाळ सावरण्यासाठी
राखेतून उठतेय
'फिनिक्स' बनून
तू मात्र रोवलेस
कांटेरी कुंपण
उभारलास चक्रव्यूह
माझ्या भोवती
अन् छळतेस 'गिनिपिक' बनून
पण आता पांढऱ्या पेशी पेटल्यात
सगळ्या नसा चेतल्यात
परजताहेत सुरा
संस्कृती, तुझे फाडण्यासाठी उदर
जन्मठेप होऊ देत
अगर फाशी देऊ देत
मला नाहीं त्याची कदर –!!!

# माय

माय,
माय मी सडासारवणय
करणार नाय
गे कल मी इचारलंय
चाय पिऊ?
तेवा तु म्हटलंस
दादा पिल्या बिगर नको घेऊ!
आणि तशीच तू माका
कामाक जुंपलंस
भांडी घासून हाताची सालपटा गेली
तरी पानी शेंदूक लावलंस
तेवा दादा बिछाण्यावर
जांभयो देत हुतो माय !!
आणि सांचे शाळा सुटल्यावर
दादान काढल्यान शाळेची पॅन्ट
खुशाल गेलो बाहेर पडोन
घेवन आपली चेंडू बॅट
तेवा मी इचारलंय,
माय, जाव खेळूक?
तर तू म्हटलंस 'नको चेडवा'
आणि लावलंस चपाते वळूक
दोन डोळे, दोन कान
दोन हात दोन पाय
मग दादात नि माझ्यात
फरक काय?
म्हणूनच माय,
सडासारवण करणार नाय
कारण तेच्यात उमटणारी रेषा
माझी भाग्यरेषा ठरणार हाय !!

# थांबा डॉक्टर थांबा –...

थांबा डॉक्टर थांबा ..
आपला हात पकडते
म्हणून रागावू नका!
कारण आपल्या
पांढऱ्या शुभ्र हाताची बोटे
मला काळी कां दिसताहेत?
आपल्या शीरा तणतणल्या आहेत
पापण्या फणफणल्या आहेत
माझ्या व्याधीचा वेध घेताना
चाचपडणाऱ्या श्वासाची कंपन
रणरणत्या उन्हासारखी भणभणताहेत
बुरसटलेल्या नजरेचा स्टेथास्कोप
माझ्या नजरेला भिडताना
बेसुमार तापही उडलाय ...
आणि असह्य वेदनांचा आगडोंब
आपसुक विझलाय!
अहो, प्रसववेदना सहय करणारी
स्वतःच स्वतःची आंसवे पिणारी
जात आमची
डॉक्टर...
या आजारात मेले तरी बेहत्तर
थांबा डॉक्टर ... थांबा
खरेच उपचार करू नका!!
पण मी म्हणते
माझी समस्या अलैंगिक असतांना
उत्तेजक अवयवांशी चाळा करायची
काहीं गरज आहे कां?

# - निष्ठा -

दशकामागून शतके गेली
शतकामागून "युगेही" गेली
त्यांचा सत्कार करत करत
विरहाची मी वेदना प्याली
तू मात्र
भेटीसाठी विनवल्यावर
ज्वालाग्राही चीत्कार करत
निष्ठुरतेने गदगदलास
खिन्नतेने खदखदलास
पण कां?
की धुळीकण म्हणत होता
तू एखदा
पूर्वेच्या उंबरठ्यावरून डोकावताना
मला आकाशाच्या कवेत पाहिलेस
कधी कधी वाऱ्यासंगे
कधी कधी ताऱ्या संगे
हासताना, नाचताना
संशयाने बघितलेस
त्यांचा डूख धरलास नाहिस नां?
तरीही आता
आसाच्या देठापासून
निपजलेली निष्टा
मी मात्र जपणार आहे
जपता जपता तुझ्यासाठीच
तुझ्यासाठीच संपणार आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४९७
दा. क्र. २०.८.८३
काव्य ७५१।५।८६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# निर्णय

माझ्या मधाळलेल्या ओठांवर
अमृत साचले असे तू म्हणतोस
ते चोखण्यासाठी, तू आसुसलासही
पण माझा एकाकीपणा
तू टिचकी मारुन उधळून द्यावास
असे मला वाटत नाही
प्रेमाच्या नवथर नशेत
मला फुलासारखे जपण्याचे
आश्वासनच का देतोस?
म्हणून मला अनाकलनीय
आकर्षणच वाटत नाहीं!!
माझ्या नाजूक बोटांवर
तुझे जीवन नटले असे तू म्हणतोस
ते धरून वाळूवरून चालण्यास
मनापासून आतुरलासही
पण प्रेमाचा किल्ला
किनाऱ्यापासून दूर कां बांधत नाहीं?
जेथे लाटेची झेपही पोचण.र नाहीं ...
जर हे केलेस
तर ओठावरले अमृत
अनिर्बन्ध चोखायला देईन
नाजूक बोटांच्या नाजूक लकेरीत
तुला आणि तुलाच कवेत घेईन ...!!!

# अनुबंध

व्याकूळलेली तुझी नजर
माझे काळीज भेदून गेली
तेव्हां मी कागदावर
तुझ्या माझ्या अनुबंधाच्या
रेघा ओढत होते
स्टाफरूममधल्या
किलकिल्या नजरा झेलताना
टाईपरायटरच्या तबकडीत
मला तुझेच रूप दिसत होते
'मॅडम' हल्ली लेटरिंग चुकतेय
असा बॉसही म्हणाला
म्हणून त्याला सॉरी म्हणताना
तुझेच स्वप्न पहात होते.
अरे तुझ्या इशाऱ्यावर
कावेरीच्या किनाऱ्यावर
सांगशील ते करण्यासाठी
मनापासून तयार होते
पण ऑफिस सुटल्यावर
सरसावल्यास हिरव्या नोटी
मग फारस रोडला कां जात नाहींस
'ते' सुख खरीदण्यासाठी?
व्याकूळलेली तुझी नजर
माझे काळीज भेदून गेली
पण तुझी सौदेगिरी
अनुबंध छेदून गेली
अनुबंध छेदून गेली

# टिळा

टिण ऽऽ टिण ऽऽ टिण ऽऽ
घंटी वाजवतानाच खांद्यावर पडलेला हात
विहीरीची खोली आजमावत होता
तेव्हां मलाही वाटत होतें
कुणीतरी माझे गाल थोपटावेच !
पण तुझ्या घंटेसरशी
माझ्या विचारांची वर्दळ
दिशाहीन वावटळीसारखी
भरकटत होती वेड्या ...
तेवढ्यात तुझा चोरटा हात
मिनी स्कर्ट मधून वर सरकला
आणि माझ्या केसांची बटा
अलगद तुझ्या गालावर आदळली
तुही तुझ्या बोटांची मोहीम ओठांशी वळवून
माझ्या 'ब्रा' शी चाळा करताना
किंचितही कचरला नाहीस !
तुझा 'बा' नेपोलियन तर नव्हता ना?
आणि आता तर
इंजीनाच्या दवथा आवाजाच्या साक्षीने
भीष्म प्रतिज्ञा करतोस!
मी दिलेल्या सुखाची देण म्हणून
अमावास्येत गुलाबलेला सहवास
झुंजूमुंजू झाल्यावर सजवायचा म्हणतोस!
अगदी अनंतासाठी
पैंजणाच्या रुणझुणीसहित
चांदणे शिंपित ये म्हणतोस!
पण, बदनाम वस्तीतील
मुक्लपक्षाचे नितळ चांदणेही
बदनाम असते यार!!
मी एक वेश्या आहे ... वेश्या ...
माझ्या भाळावर टिळा लावण्यास
तू आहेस तयार?

# सांगशील कां गं आई ?

सांगशील कां अं आई?
तू आता मोठी झालीस,
मोठ्याने बोलू नकोस
पदर ढळू देऊ नकोस
तू आता मोठी झालीस
शेजारी बसू नकोस
शेखर सवे हसू नकोस
तू आता मोठी झालीस
गोड गाणी गाऊ नकोस
बाहेर एकटी जाऊ नकोस
हें फुलपाखराला
कोण कशाला सांगत नाहीं?
म्हणूनच आई,
आज सायंकाळी
गेले निघून माळरानी
तेव्हां वाटेत शेखर भेटला
हासत-नाचत खूप खूप बोलला
सांगशील कां गं आई?
तो म्हणाला
बाळ योनीतून येते . . . !
मग तू कां म्हणालीस
बाळ बेंबीतून येते ?

# अहो ऐकलेत कां ?

अहो, ऐकलेत कां?
नाशिकला जायचे रद्द करा ...
नाहीं म्हणजे तसे मला माहित आहे
तीन दिवस शमीची पाने लुटता येणार नाहींत
म्हणून ही पळवाट आहे ...
पण विज्ञानाचे प्राध्यापक असूनही
अज्ञानाचा अंगरखा कां पांघरता तुम्ही?
जरा कचऱ्याच्या डब्यातील सॅनिटरी पॅड पहा
त्याची अस्वच्छता
आपल्या रिवाजांच्या डबक्यापेक्षा
कमीच भासते मला!
मी स्वच्छतेची परमोच्चता गाठत असता
माझ्याच घरात
मला नीचतेचा आहेर कां बरे देता?
म्हणूनच ... !
आपले ठरलेले प्रोग्राम
ठरलेल्या वेळीच होणार आहेत म्हटले
उद्याचे केळवण, यमीचे डोहाळेजेवण सुध्दा!
परवाचे अष्टविनायकाला जायचे
मी निश्चित केलेच म्हणायचे ...
कारण,
सर्जनशीलतेसाठीच्या उत्सर्जनाने
कोमेजतात फुले
असे तुम्हांला कोणी सांगितले ?

# शींड

तू काल कुत्सितपणे म्हणालास,
'मुक्ता', तुम्ही हल्ली मॉड बनत चाललाय"
पण मुसळधार वेदनांच्या टपोऱ्या धारांनी
सर्वांग भिजलेच आहे . . .
मग झावळीच्या सावलीने छातीपर हात घेत
लाजवटपणे चालायची मला गरज काय?
तू काल कुत्सितपणे म्हणालास,
'मुक्ता' तुम्ही हल्ली 'मॉड' बनत चाललाय
पण तुझ्या काटेरी नजरेच्या बोचऱ्या गारांनी
माझ्या पोलक्याच्या बाहुचा कुरतडल्या
त्याला मी तरी करणार काय?
तू काल कुत्सितपणे म्हणालास,
'मूक्ता,' तुम्ही हल्ली 'मॉड' बनत चाललाय
सहावारी गेली, नऊवारी गेली
सलवार मीनी, बिकिनी आली . . .
पण खंडीभर हुंड्यासाठी जळणारी साडी
तू बघितलीस काय?
तू काल कुत्सितपुणे म्हणालास,
मूक्ता, तुम्ही हल्ली 'मॉड' बनत चाललाय
हो खरेच!!!
आज आम्ही प्रत्येकीने
सोडून दिले जुनेर जूने
पण जुन्या जुनऱ्याचे
जीवननौकेसाठी –
शीड बनवले हाय – . . .

## ठिणगी

खडकाळलेल्या पाऊलवाटेवरील
अंधाळलेली वाटचाल
बदलतानाच –
प्राचीवरच्या सूर्याचे
प्रखर तेज
मी शोधून घेतले आहे
पापणीखाली
उमटलेली काळपट वलये
तेव्हाचीच –
आता माझ्या नजरेस
भिडलीच तुझी तिरकी नजर
तर 'ठिणगी'।
उडलीच म्हणून समज

## हिरवा चुडा

उंबरठ्यावरील माप
उलयतानाच पाहिले
तेव्हा समता ...
सैतानांच्या नजरकैदेत होती
म्हणून माझ्या जीवनसाथी
साखरपुड्यात चढवलेला
हिरवा चुडा
मी उतरून ठेवत आहे ...
कारण त्याच्या खणखणाटात
मी केलेला आक्रोश
दडपून जाणार आहे –
दडपून जाणार आहे –

# दव

शिशिराच्या गारव्यात
पारवा देखील गात होता
तेव्हा तुझ्या हातात
मऊशार हात होता
बाहुपाशात हळूच
मुसंडी मारलीस
म्हणून समीरानें
सूरही धरला होता
बोटांची लकेर ओठावर ओढतांना
तू हसलास ... अगदी दिलखुलास
म्हणून तुला
चुरगळलेली कॉलर सरळ करतांना
शुक्लाच्या चांदण्यांचा आहेर ही दिला
केसांची सळसळ
चंदनी गंधात ललकारली
तेव्हां सागराची लहर
उफाळत उफाळत
उन्मेषाने हाकारली
हाय!! हाय!!!
तरीही तुझ्या मेलेल्या नसा
संजीवल्या नाहीत रे ... !!!
अरे,
तृणापानावर साचलेले 'दव'
माझे अश्रू तर नसतील ना?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४१
ना. क्र. ३०१९४३
काव्य १५।५।८६
शाखा (स्थळ

# समजून घेशील कां ?

आयुष्याच्या पाऊलवाटेवर
पराधीनतेचे सावट
पाठलाग करते
तेव्हा प्रयत्नांतीही
आपसूक पडते
कोलमडून –

म्हणून माझ्या उदासीनतेत
मीच शोधते मला
तर पुढ्यात आदळते
निराशेचे तुळशीपत्र
उलगडून . . . उलगडून!!!
प्रयत्नांची आंदोलने

वैफल्याच्या वलयात
गुरफटतात –
आणि दबलेल्या श्वासाने
तुंबलेली स्पंदने
धुरकटतात –
तरीही चाचपडत चाचपडत चालताना

चवताळलेली गिधाडी
चोची मारतातच
म्हणून माझी निरांजनी नजर
अगतिक झालीय
ओठावरील वेदना
हिंदोळून आलीय!!

तू मला प्रेमाची
सुसंगत देशील कां?
माझ्या सहित
माझ्या व्यक्तिस्वातंत्र्याला
समजून घेशील कां?

## हुजरे शब्द

रेलगाडीच्या गडबडीत
नि टाईपरायटरच्या वडबडीत
पी. टी. उषाचा ॲथलेटिक्स विक्रम
मी अनेकदा मोडकळीस आणते
पण याची नोंद कोण करते कां?
म्हणून,
पदराच्या सावलीखाली
सारेच सावरतांना
शीणलेला जीव
क्षणभर जमिनीवर टाकू ना?
त्यासाठी
तुला पसंत नसले तरी
मला उसंत देण्यासाठी
उतू जाणारे पातेले
तू आता उतरू ठेवायला हवे
कारण,
मान लवविणारे
'हुजरे शब्द'
गांव सोडून गेले आहेत.

-०-०-

## मला मुलगा झाल्यावर

मला मुलगा झाल्यावर
तू तुफान आनंदलास
जल्लोषाच्या उन्मादात
हासलास नाचलास
आणि सर्वांकडून माझ्यासमोर
सन्मानाची आरास करविलीस
तेव्हां मी सुखाचा सुस्कारा सोडला
'पण तत्पूर्वी'
रात्रीचे आंबवण
गटारात पडत नव्हते
याची आठवण आहे तुला?

# पेगच पेग

एक पेग . . . फक्त एक पेग .
रसिल्या संगीताच्या नशिल्या सुरावटीत
बॉसनें केलेली ऑफर
इतरांप्रमाणे मीही स्वीकारली
आणि अगतिकतेच्या पोटी
प्रागतिकता जपण्यासाठी
स्वतःच स्वतःशी बंडाळी पुकारली
चीअर्स!!
आपसुक ग्लासाला ग्लासे आदळली
पण चितूकाकांच्या हॉटलात बसून
चहा प्यायला
असभ्यपणा समजणारी मी,
हातात घेतलेला पेग
घशाखाली कधी नेला
समजले नाही
मग दुसरा नि तिसराही!!
तशी स्वतःस शीष्टच समजणारी
त्रयस्थ नजर भिडल्यावर नाक फेंदडणारी
अन् इथे हळूच बॉसने चुरगळलेला हात
कां झिडकारू शकले नाही?
आजूबाजूला वादळ सुटले होते
त्यात कोणीच कोणाला विचारत नव्हते . . .
फांद्याला फांद्या
नि बुंध्याला बुंधे आदळत होते . . .
रंगलेल्या पार्टीत सारेच रंगले होते
आणि बेमुर्वतपणे
जवानीची नशा पीता पीता
बॉसचा अलगद पडलेला
कमरेभोवतीचा विळखा
मला बेडरूम मध्ये घेऊन आला होता
मलमली बिछाण्यावर

'ब्रा' चे बक्कल तुटल्यावर
हेतूही कळला होता
तेव्हां मी फक्त तारे मोजत होते . . .
पौर्णिमेच्या भरतीने की काय?
सागरही उफाळला होता
अन् पापणी लवते न लवते
तोच आभाळ कोसळले होते!!
तेव्हां सागराची लहर
क्षणभर कां बरे स्थिरावली?
पाडून एक भयानक भेग
ओढून एक अनामिक रेघ
तोडून आयुष्याचा अवघा वेग
म्हणून आता माझ्या हाती
अहोरात्र . . .
पेगच पेग . . . पेगच पेग . . .

# अर्भकाचे प्रश्न

आई, सतीची चाल
लॉर्ड बेंटिंगने
कायद्याने बंद केली म्हणतात
मग हा हलकल्लोळ
कसला ऐकू येतो गं?
कलिंगच्या युद्धात
अशोकने केलेली कत्तल
सुमार होती म्हणतात
मग बेसुमार मुडदे
कां फडफडतात गं?
सर्पाळलेल्या वेदनांचे
नर्काळलेले पडसाद
आज तुझ्या गर्भातील
अर्भकावर पडतात . . .!
आई, ही दुनिया कशी आहे गं?
आई, ही दुनिया कशी आहे गं?

# गोडवादळ

बेबीच्या जरा खाली झालेले
गोडवादळ
पर्यायाने बेबीच्या
जरा वरही आले
तेव्हा काळीज धडधडले ...
पण गर्भजलात चाहूल लागताच
स्त्रीत्वाचे पाऊल म्हणून
पतनासाठी कां सरसावतोस?
माहित आहे मला
सरकारने तुला
तुझ्या चुकीच्या दुरुस्तीसाठी
कायदेशीर मुभा दिली आहे
तरीही टाकणार नाहीं मान
मोनी गाय बनून मुकपणे ...
दुडकीवरून दिडकीवर
मग ओल्या ओल्या पंदरावर
जबाबदारीची भूते हुंदडत ठेवून
वंशाच्या दिव्यासाठी
खंडीभर पोरे वीताना
माझ्या हक्काला
क्रूसावर कां चढवलं?
आणि ते मढे
माझ्याच डोक्यावर देताना
परंपरेचे कडे कोरळून
रूढीच्या कुबड्या
माझ्याच कांखेत कां कोंबल्यास?
हक्काची मादी बनवून
आदीमाकडून अनंताकडे
दरवाजाची कैदी बनवून
मुक्ततेकडून बंधनाकडे
मी लंगडत लंगडत चालताना
तुला मौज वाटते कां?

आता कडकडणाऱ्या वीजा
कानात कुजबुजल्या आहेत
म्हणूनच –
मुक्त संचार करण्यासाठी
संकल्प पूर्तीसाठी
तू काट्याने खोवलेला
माथ्यावरील पदर
कमरेस खोचत आहे . . .
मला वाटते,
कुलदिपकाची कळकट कल्पना
संदर्भासहित पुसून टाक . . .
करंगळीवर आभाळ पेलणारी
कन्यादेखील
सांभाळ कां करणार नाही?

## ध्येयगीत

अनवाणी मी चालत राहीन
ध्येयगीत हे गातच राहीन
अवघड कणखर पर्वतरांगा
यत्नप्रयत्ने तुडवत राहीन
प्रगती कोठार साठाया
मला जायचे हिमगिरीला गाठाया –

उभे रांकडे संकट माहित
झाले बेहत्तर बर्फच्छादीत
सारे बळ मी करीन संचित
जीत तरी ना होईन वंचित
तरी ही राहिन चालत चालत
ध्येय गंध हा चाखाया
मला जायचे हिमगिरीला गाठाया –

प्राण प्राण हा एकवटोनी
लढेन वेळी दोन्ही करांनी
अतीरथी महारथी अवतरले तरी
फोडीन कोंडी स्वये बळांनी
शीर उडाले तरी बेहत्तर
तरी ना घेईन माघारी कर
दिप क्रांतीचा पेटाया
मला जायचे हिमगिरीला गाठाया –

# महापूर

तुला श्रद्धांजली वाहताना
पावसाळलेली पापणी
पुसावीशी वाटत नाही
आयुष्याच्या मावळतीला
माझो जीर्ण कंकणें

खणखणत असताना
तुझी कोवळी कंकणे
कचाकचा फुटताना पाहिली
तेव्हां माझी वाचा कां नाही गेली पोरी?

मेंदीने फुललेले तुझे हात
हळदीने खुललेली तुझी कात
भयाण भेसूर आक्रोशात
चिणचिणत जळताना
चवचवणाऱ्या धुराड्यात
माझ्या डोळ्याच्या खाचा
कां नाही झाल्या पोरी?

मात्र एक,
त्याचा उद्रेक
माझ्या धमन्यातून गदगदला होता . . .
पण टकुरे फोडण्यास
सरसावलेल्या काठीनेच दगा दिला पोरी

झटपट ण्यापूर्वीच
लटपटत निष्प्रभ बनली बिचारी
आता तू ओघळणाऱ्या आंसवात दिसतेस
रातराणीच्या गळलेल्या पाकळीत दिसतेस
रणरणत्या सूर्याच्या रसांड्यात दिसतेस
म्हणूनच

जीवनभर जमवलेली जायदाद
तुझ्याच स्मृतीने दान करत आहे
त्यातून

काटेरी काहूर रिचवण्यासाठी
खूरही बणकट व्हायला हवेत
मन मनगट बळकट व्हायला हवे

नारीनो तुमचा नारा
गगणाला भिडायला हवा

ज्वालाग्राही चीत्कारही
दरीदरीतून उमडायला हवा
तुला श्रध्दांजली वाहतांना
ओघळणाऱ्या आसवांनी
महापूर यायला हवा –
महापूर यायला हवा

# चैत्रवेलीचे मनोगत

मधुचंद्राच्या रात्रीच
अधाशी ताऱ्यांचा
उदासी हुंकार
मी कोळून प्याले
अलगद पडणारे
आसवांचे थेंब
पदर पसरून
साचवत आले
हृदयावर आदळणारे
अनामिक पडसाद
शीरशीरी शिगेस पोचली
तरी रिचवत आले
मुसमुसलेल्या ओठावरील
रसरसलेला हुंदका
दातानीच दाबून
पचवत आले
केसांची सळ सळ
षड्ज छेडताना
भैरवीचे सूर
आळवत आले
आता मात्र
वसंतलेली चैत्रवेल
मी ग्रीष्मवणार नाहीं बरे ...
अरे, निष्पर्ण वृक्षाच्या
रूक्ष सावलीला
मी कशाला थांबू?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५४९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0024943
REFBK-0024943